# मैत्र जीवाचे

**सरिता पदकी**
padkisarita@yahoo.com



नेहमीप्रमाणे माझ्या घरी आमची छोटीशी बैठक भरलेली आहे. बहुसंख्य ( म्हणजे दहाच्या आसपास ) सभासद जवळून–दुरून आवर्जून उपस्थित राहिलेले आहेत. आपल्या जवळच्या स्नेह्यांना भेटण्यासाठी, त्यांच्याशी गप्पा मारण्यासाठी आणि आपल्या मनातलं सांगण्यासाठी प्रत्येकजण उत्सुक. कारण ते जसे गरजू जनांचे तसे एकमेकांचे जिवाचे मैतर नां !

भेटल्याबरोबर हसून स्वागताचा, तिळगुळाचा देवाणघेवाणीचा कार्यक्रम होतो, थोडयाश्या इकडच्या तिकडच्या गप्पा होतात आणि मग सुरु होतो प्रत्येकानं महिन्याभरात केलेल्या कामाचा आढावा, त्यात आलेल्या अनुभवांचा उच्चार.

अफझलपूरकर दांपत्य आणि अरुणकुमार कोंडेजकरांनी हल्ली एक नवीन काम अंगावर घेतलं आहे–'श्रीवत्स'चं. श्रीवत्स ही अनाथ मुलांचं संगोपन करणारी संस्था. तान्ह्या बाळांपासून मोठया मुलांपर्यंत सगळ्यांना इथे संस्थेचे कार्यकर्ते सांभाळतात. योग्य ठिकाण मिळाल्यावर त्यांना दत्तक देतात. सरकारी मदत न घेण्याच्या आग्रहामुळे ( या निग्रहाची कारणे सगळयांना माहिती आहेतच! ) स्वयंसेवकावरच त्यांचा भरिभार असतो. हे दांपत्य बऱ्याच वेळा तर कोंडेजकर रोजच संस्थेत जातात नि हवी ती मदत करतात. या महिन्यात एक दत्तकविधान तर अफझलपूरकर दांपत्याच्या साक्षीनं झालं, नियोजित आईवडिलांनी त्यांच्या पाया पडून नवीन बाळाला आपलं म्हटलं. आणि या दांपत्यानं त्या दिवशी सर्वांना भोजन दिलं.

शुभदाताई डोंगरे आज विशेष खुषीनं बोलत होत्या कारण घरकामगारांसाठी त्यांच्या जनवादी महिला संघटनेनं गेली आठ वर्ष सरकारच्या कानीकपाळी ओरडून, मोर्चे काढून केलेल्या मागण्या पुऱ्या करण्याचं आश्वासन सरकारनं दिलं होतं. त्या अन्वये आता मोलकरणींच्या आजारपणात लागणारा उपचारांचा खर्च सरकार देणार होतं, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या खर्चाचा वाटा उचलणार होतं, त्यांना पेन्शनसुद्धा मिळणार होती. त्या मागण्या मान्य करवून घ्यायला मोलकरणींत जागृती आणण्याचं कठीण काम गेली कित्येक वर्ष त्यांच्या वस्त्यांतून जाऊन–आरोग्याला धोका पत्करून करीत होत्या आणि या सगळया धडपडीला यश मिळण्याचं चिन्ह दिसायला लागलं होतं. अभय देशपांडे उमेद परिवार या अपंग संस्थेचे खंदे कार्यकर्ते आहेत. शिवाय ते खेडयातल्या मुलांसाठी डोंगरावर काढलेल्या शाळेचे विश्वस्तही आहेत. नुसत्या शाळेतल्या शिक्षणानं मुलांना व्यवहारज्ञान येत नाही. उदा. बँकेतले, पोस्टाचे असे दैनंदिन व्यवहारही त्यांना करता येत नाहीत. तेव्हा त्यांच्यासाठी शिबिरंच घ्यावीत असा प्रस्ताव त्यांनी मांडला.

विजयाताई जोशींनी त्यांना आलेला एक पोलिसखात्याशी संबंधित अनुभव अगदी उमाळयानं सांगितला. त्यांच्या ओळखीच्यांच्या घरात चोरटे शिरले आणि चोरी करून पळून जायला लागले. हे त्या घराच्या मालकिणीच्या लक्ष्यात आलं आणि ती स्कूटरवर त्यांचा पाठलाग करायला लागली. ( तिच्या मदतीला कोणीही आलं नाही हे वेगळं सांगायला नको. ) चोरटे तिच्या हाती सापडले नाहीतच पण त्यांनी थोडं पुढे जाऊन कुठल्याही बाईला लाजेनं मेल्याहून मेल्यासारखं होईल अशी कृती केली. बाई नाइलाजानं घरी परत गेल्या.

त्यांच्या आसपास ठिकठिकाणी तरूण मुलं मुली नको ते चाळे करीत असायचे. या दोन्ही गोष्टी बाईंनी विजयाताईंना कळवल्या. तरूण मुलामुलींचे बीभत्स चाळे विजयाताईंच्या घराच्या आसपासही चालत. मग विजयाताईंना राहावलं नाही. त्यांनी हे सगळं कळवणारं पत्र पोलीस मुख्यायुक्तांना पाठवून कारवाईची मागणी केली. या पत्राला उत्तर आलं ते तब्बल सहा महिन्यांनी! त्यांना त्यांच्या विभागातल्या पोलीस कचेरीत बोलावलं होतं. विजयाताई कोणाच्याही सोबतीची वाट न पाहता एकटयाच पोलीस चौकीत गेल्या. तिथे त्यांची चौकशी करण्यात आली आणि त्यांच्या पत्राप्रमाणे पोलीस बंदोबस्त वाढवल्याचं सांगून त्यांची त्या पत्रकावर स्वाक्षरी घेतली. हे सगळं एकटीनं करतांना गुंडांच्या दहशतीची भिती होतीच. पण ते विजयाताईंनी टाळलं नाही. उलट आपल्या डोळयांसमोरच झोपडपट्टीतल्या एका बाईला मुलं दगड मारीत असतांना आपण

एकटया काही करू शकलो नाही याचाच त्यांना उद्वेग वाटत होता.

विजयाताईंच्या साहसाला सर्व सभासदांनी टाळ्यांनी दाद दिली. “आपण साधना व्हिलेज”ला केव्हा जायचं असा प्रश्न श्री. अनिल बिजूर यांनी काढला. साधनाव्हिलेजमध्ये प्रौढ मतिमंदांची राहण्याची सोय केली आहे. तिथल्या काही मुलांना आमच्यापैकी कोणी कोणी दत्तक घेतलेलं आहे. म्हणजे त्यांना फोन करायचे, त्यांच्या वाढदिवसाला त्यांच्या आवडीचं काहीतरी न्यायचं असं. आता त्यांना भेटायची वेळ झाली होती.

या साधनाव्हिलेजनं आसपासच्या काही खेडयांतून सुधारणा कार्याला सरुवात केली होती. तूर्त त्यांनी गरीबांना द्यायला कपडयांची व भांडयांची मागणी आमच्याकडून केली होती. तशी माझ्या घरी आणून ठेवायचं ठरलं. ( आणि चार दिवसांनी उत्तम कपडयांचा ढीग जमलाही! )

श्री. बेंद्रे यांनी युवा क्रीडास्पर्धेत दोन अपंग मुलांना सहभागी करून घेतलं. अपंगांच्या क्रीडास्पर्धाही ते रोटरीक्लबतर्फे योजतात.

माझ्याही 'नीहार'वरच्या लेखाबद्दल मी सांगितलं.

खाणंपिण्याचा छोटासा कार्यक्रम उरकून मंडळी घरोघर गेली ती आमच्या मंडळाच्या दशकपूर्तीचा आनंद मनात घेऊनच.

आमचं हे मंडळ दहा वर्षांपूर्वी सुरू झालं. तेही 'सकाळ' मध्ये आलेल्या एका जाहिरातीमुळे. “रुग्णसेवा करायला, रुग्णाशी गप्पा मारायला, त्याला औषधं वगैरे आणून द्यायला आम्ही रुग्णालयात किंवा घरी येऊ” अशी ती जाहिरात होती. खाली फोन नंबर दिलेला होता. आजारी असलेलाच काय, कुठल्याही संकटात सापडलेला माणूस अगदी एकाकी होतो याची जाणीव असलेल्या, आणि त्यासाठी काही करू इच्छिणाऱ्या आम्ही काही जणांनी त्या फोन नंबरवर फोन केला. ती जाहिरात दिली होती श्री. विश्वास व सौ. सरिता जोशी या दांपत्यानं. त्यांच्याकडेच आम्ही एकदिवस जमलो आणि तोवर एकमेकांची नावंही ठाऊक नसलेले आम्ही एकमेकांचे जिवलग मित्र बनलो. माझं घर हे कार्यालय, आणि माझा फोन हा कार्यालयाचा फोन असं ठरलं आणि लगेचच कामाला सुरुवातहै झाली.

यातले श्री. अभ्यंकर आज आपल्यात नाहीत. त्यांची एक प्रवासी बस होती. ते स्वतः अर्धांगाचा झटका येऊन गेल्यामुळे अपंग झाले होते. पण आदिवासी वस्तीत जाऊन औषधोपचार करण्याचं काम त्यांनी अनेक वर्ष केलं होतं. लोणावळयाजवळ टाकळे येथे त्यांनी स्वखर्चानं डॉक्टर आणि औषधं नेऊन पंचवीस शिबिरं घेतली. त्यांत तर आम्ही सामिल झालोच, पण ते करीत असलेल्या बालग्राम या संस्थेच्या शिवाजीनगर स्टेशनजवळच्या फूटपाथ आणि प्लॅटफॉर्म वर राहणाऱ्या मुलंसाठी चालणाऱ्या आसराघराच्या कार्यातही आम्ही सहभागी होऊ लागलो. त्या मुलांना शालेय साहित्य, कपडे, सतरंज्या, एखादं जेवण असं तर आम्ही दिलंच पण तिथं नव्हती ती बाथरूमही आम्ही बांधून दिली.

सुरुवातीच्या काळातला एक प्रसंग मला आठवतो आहे. एके दिवशी मला श्री. जोशी यांचा फोन आला की आईवडील आणि त्यांचा वीसबावीस वर्षांचा मुलगा यांना तुमच्याकडे पाठवतो आहे, त्यांच्याशी तुम्ही बोला. त्याप्रमाणे ती तीघं माझ्याकडे आली. त्या बावीस वर्षांच्या मुलाला तर धड

चालताही येत नव्हते.  दाराला आणि भिंतीला धरुन तो पाऊलापुढे पाऊल टाकत दिवाणावर जाऊन बसला.  त्याचे आईवडीलही आसपास बसले आणि सांगू लागले, तो कधीही नापास न होणारा मुलगा संगणकाच्या परीक्षेला बसला आणि अकल्पितपणे नापास झाला.  नापास होण्याचं भीषण दु:ख तर होतंच, पण त्याहीपेक्ष असह्य झालं मित्रांचं चिडवणं.  'नापास झाल्याबद्दल अभिनंदन' असं म्हणणं.

त्या मुलाला प्रचंड नैराश्य आलं. , झोप लागेना, तो कॉलेजमध्ये जाईना.  त्याला मानसोपचारतज्ज्ञाचे उपचार चालू झाले.  ज्यांना कळलं ते शेजारी म्हणायला लागले, 'याला वेड लागलं".  आईवडीलांना तर खरोखरच वेड लागण्याची वेळ आली.  बरं, हे सर्व बोलायचं तरी कोणाजवळ? कुठूनतरी त्यांना आमच्या मंडळाची माहिती लागली आणि मनातलं मोकळेपणी बोलायला वाव मिळाला.

मी त्यांचं नीट आगतस्वागत केलं.  ती दोघं मोकळेपणी सांगत गेली.  मी लक्षपूर्वक ऐकून घेतलं.  हळूहळू मुलगाही बोलायला लागला.  दोनेक तास बसून ते लोक निघून गेले. आनखीही काही वेळा आले.  एकदा मुलगा म्हणाला की "त्यांच्या घरी गेलं की आपल्या घरात गेल्यासारखं वाटतं'.

औषधांमुळे आणि या गप्पांमुळे तो मुलगा बरा झाला याचा आजही किती आनंद वाटतो!

एक दिवस अशीच दहाबारा वर्षांची अनाथ मुलगी मैत्रिणीनं माझ्याकडे दोन दिवसांसाठी आणून सोडली.  जोशी दांपत्याला कोणीतरी सोबतीला हवंच होतं.  'हिला ठेवून घेता कां?" म्हणून विचारल्यावर ते आनंदानं तयार झाले.  वेगळाल्या क्लासेस मध्ये घालून त्यांनी तिचं चौथीचं वर्ष पुरं केलं आणि मग तिला महर्षि कर्वे स्त्रीशिक्षणसंस्थेच्या वसतिगृहात प्रवेश मिळवून दिला.  तिची शैक्षणिक प्रगति झाली.

याच सुमाराला श्री.  अभ्यंकरांचं निधन झालं.  त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितलं की आम्हाला जवळपास जागा बघून द्या आम्ही गरीबांना जुजबी फीमध्ये उपचार करू. आम्ही आमच्यातच पंधराहजार रुपये उभे केले, त्यांना जागा बघून दिली, आता डॉक्टर आपल्या शक्यतेनुसार काम बघतात.

अशी विविध कामं गेली दहा वर्षे सुरु आहेत.  कुणी रस्ता झाडणाऱ्यांना रोज घरी बोलावून चहा देतं, कुणी एकाकी वृद्धांना सोबत करतं, कुणी कॅनडातल्या नातेवाईकांकडून आलेली मदत अनाथालयात पोहोचवतं, कुणी मूकबधिरांना शिकवतं, त्यांच्या सहली काढतं.  कोकणातल्या मंडणगड तालुक्यातल्या घराडीला निघालेल्या अंधशाळेला मी भरघोस भांडीकुंडी आणि सामान तर दिलंच, पण बाकीचे सदस्यही सतत मदत करतात.  तिथल्याच वृद्धाश्रमाला आम्ही थोडी औषधं देतो.  इथल्याही संस्थांना भेटी देतो, जमेल तशी मदत करतो.

दहा वर्षात दहा जणांनी केलेल्या कामाची काहीशी कल्पना या लेखावरून येऊ शकेल. आम्ही मोठा निधी गोळा केलेला नाही, पण कोणी काहीही दिलं तर आम्ही ते आनंदानं घेतो. सरकारी नोंदणी केलेली नाही.  प्रत्योकजण आपापल्या परीनं चांगलं काम करतो आणि आपण कायकाय काम केलं ते मासिक सभेमध्ये सांगतो.

जैन धर्मामध्ये अणुव्रताची कल्पना आहे.  म्हणजे प्रत्येकानं अणूएवढंतरी चांगलं काम करावं. आणि गीतेनं तर सांगून ठेवलंच आहे, “स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्”

आमची अशी श्रद्धा आहे की उभ्या जगभर मैत्र जीवाचे सारखं काम चाललं तरच आजचं जग भयमुक्त होईल.  आमची पावलं त्या दिशेने निघाली आहेतच. या प्रवासात साऱ्यासाऱ्यांची सोबत हवी आहे.

मिळेल?